# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- १२ मे, २००५.**

**राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप (दुसरी सुधारणा) आदेश, २००५.**

क्रमांक-एसईसी/पीपीआर/२००४/सीआर-१/डी-११, - ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-२४३ के व २४३ झेडए अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, राज्य निवडणूक आयोगाने "राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, २००४" क्रमांक-एसईसी/एमसी/२००४/सीआर-२६/डी-५, दिनांक- २० नोव्हेंबर, २००४ **महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण** यामध्ये प्रसिध्द केला आहे

आणि, उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाल्याने, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

या आदेशाला **"महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप (दुसरी सुधारणा) आदेश, २००५"** असे म्हटले जाईल. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप, २००४ (यानंतर पुढे ज्यास "मूळ आदेश" संबोधले जाईल) च्या भाग-३ च्या परिच्छेद-६ च्या उप परिच्छेद (२) यानंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात येईल ते असे :-

" परंतु असे की महाराष्ट्र राज्यात "राज्य पक्ष" म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या पक्षास त्यांच्याकरीता आरक्षित असलेले चिन्ह देण्यात येईल. "

" आणखी असे की, जर महाराष्ट्र राज्याबाहेरील एकापेक्षा अधिक राज्यातील मान्यताप्राप्त राजकिय पक्षांकरीता महाराष्ट्र राज्यासह विविध राज्यात समान चिन्हे आरक्षित करण्यात आली असतील तर राज्य निवडणूक आयोग त्या महाराष्ट्र राज्याबाहेरील मान्यताप्राप्त सर्व किंवा एका राजकिय पक्षास त्यांच्याकरिता आरक्षित असलेल्या चिन्हांचे वाटप करील किंवा त्यांना आरक्षित असलेल्या चिन्हांव्यतिरिक्त चिन्हाचे वाटप करील. "

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त
महाराष्ट्र

# STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

1st Floor, New Administrative Building, Opp.Mantralaya,
Madam Cama Road, Mumbai – 400 032,
Dated 12 May, 2005.

## THE REGISTRATION OF POLITICAL PARTIES AND ALLOTMENT OF SYMBOLS (SECOND AMENDMENT) ORDER,2005.

No.SEC/PPR/2004/CR-1/D-11. – Whereas, in exercise of the powers conferred by Article 243-K read with Article 243-ZA of the Constitution of India, the State Election Commission has made the order i.e. the Maharashtra Registration of Political Parties and Allotment of Symbols Order, 2004, No.SEC/MC-2004/CR-26/D-5, dated 20th November, 2004 and published in the Maharashtra Government Gazette (Extra-ordinary);

And State Election Commission is of the opinion that it is necessary and expedient to amend the above order, makes the following order:-

This Order may be called the Maharashtra Registration of Political Parties and Allotment of Symbols (Second Amendment) Order, 2005. It shall come into force with immediate effect.

After sub-para (२) of para ६ of Part III of the Registration of Political Parties and Allotment of Symbols Order, २००४ (hereinafter referred to as चthe principle orderछ), following proviso shall be added namely :-

‘Provided That a state party recognised in the Maharahtra State shall get the symbol reserved for it;’

**घProvided further that when more than one political party recognised in States other than Maharashtra having the same symbol reserved in different States then the State Election Commission shall allot all or one of the political parties recognise in states other than Maharastra, the symbol or symbols other than those reserved for them.**

(Nand Lal)
State Election Commissioner,
Maharashtra.